महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४

क्रं.कोविमं/उमा./गोप.I/गु.प./जुलै-२२/1681
कोल्हापूर,
दिनांक- ०२/०९/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा /उच्च माध्यमिक शाळा/
कनिष्ठ महाविद्यालये, सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय-** **उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र जुलै / ऑगस्ट - २०२२ पुरवणी परीक्षेच्या उत्तरपत्रिका गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाच्या प्रक्रियेबाबत...**

संदर्भ -. राज्य मंडळ पत्र क्रं. रा.मं./परीक्षा-२/५१४९/पुणे-०४/दिनांक- ०१/०९/२०२२

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु/मार्च-२०२० व मार्च-एप्रिल -२०२२ च्या परीक्षेसाठी निकालानंतर उत्तरपत्रिका गुणपडताळणी [Verification] , उत्तरपत्रिका छायाप्रत [Photocopy] व उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्याकन [Re-Valuation] बाबतचे ऑनलाईन [Online] प्रक्रिया राबविण्यात आली होती.

**सदर प्रक्रियेनुसारच जुलै / ऑगस्ट २०२२ या पुरवणी परीक्षेसाठी गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन बाबत ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी / शर्ती /मार्गदर्शक सुचना व विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सुचना सोबतच्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या आहेत.**

तरी कोल्हापूर विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१२ वी) **जुलै-ऑगस्ट २०२२ परीक्षेचा ऑनलाईन निकाल शुक्रवार दिनांक - ०२/०९/२०२२** रोजी जाहीर झालेला असून या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन बाबत अर्ज करावयाचा असल्यास त्यासाठी च्या अटी, शर्ती व सुचना बाबत सर्व संबंधीत विद्यार्थी / शिक्षक / पालक यांचे निदर्शनास आणून आपले स्तरावरुन अवगत करण्यात याव्यात. जेणेकरुन कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सोबत** - परिपत्रक (01 ते 12 पृष्ठे)

(डी.एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४

**गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्याकन अर्ज करणेबाबतची मुदत व ऑनलाईन प्रक्रिया**

उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै / ऑगस्ट २०२२

| तपशील | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | शुल्क | ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणा करावयाचा पध्दती | ऑनलाईन प्रक्रियेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| **गुणपडताळणी** | शनिवार दि. ०३/०९/२०२२ ते सोमवार दि.१२/०९/२०२२ | प्रती विषय रु.५०/- | Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking | ऑनलाईन निकाल जाहीर झालेच्या दुस-या दिवसापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत नमुन्यात व कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येईल. **(जितक्या विषयासाठी गुणपडताळणी अर्ज करावयाचा आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन अर्ज करताना नमूद करणे आवश्यक आहे.)** |
| **उत्तरपत्रिका छायाप्रत** | शनिवार दि. ०३/०९/२०२२ ते गुरुवार दि.२२/०९/२०२२ | प्रती विषय रु.४००/- | | ऑनलाईन निकाल जाहीर झालेच्या दुस-या दिवसापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन स्वत: किंवा माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळा/ क.महा.यांचेमार्फत विहीत नमुन्यात व कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येईल. **(जितक्या विषयासाठी उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज करावयाचा आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन अर्ज करताना नमूद करणे आवश्यक आहे.)** |
| **पुनर्मूल्याकन** | **उत्तरपत्रिका छायाप्रत मिळालेच्या तारखेपासून मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत** | प्रती विषय रु.३००/- | | ज्या विषयाचे पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे.**(फक्त उत्तरपत्रिका छायाप्रत घेतलेल्या)** अशा सर्व विषयांसाठी एकाच वेळी ऑनलाईन पध्दतीने मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावरुन स्वत: किंवा संबंधीत शाळा तथा कनिष्ठ महा.मार्फत विहीत कालावधीत व नमुन्यात अर्ज करता येईल. |

अर्ज करावयाचे संकेतस्थळ- http://verification.mh-hsc.ac.in

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**

**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४**

## गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्याकन अर्ज करणेबाबतची मुदत व ऑनलाईन प्रक्रिया

उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै / ऑगस्ट २०२२

| तपशील | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | शुल्क | ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरणा करावयाचा पध्दती | ऑनलाईन प्रक्रियेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| **गुणपडताळणी** | शनिवार<br>दि. ०३/०९/२०२२<br>ते<br>सोमवर<br>दि.१२/०९/२०२२ | प्रती विषय रु.५०/- | Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking | ऑनलाईन निकाल जाहीर झालेच्या दुस-या दिवसापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत नमुन्यात व कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येईल. **(जितक्या विषयासाठी गुणपडताळणी अर्ज करावयाचा आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन अर्ज करताना नमूद करणे आवश्यक आहे.)** |
| **उत्तरपत्रिका छायाप्रत** | शनिवार<br>दि. ०३/०९/२०२२<br>ते<br>गुरुवार<br>दि.२२/०९/२०२२ | प्रती विषय रु.४००/- | | ऑनलाईन निकाल जाहीर झालेच्या दुस-या दिवसापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन स्वत: किंवा माध्यमिक /उच्च माध्यमिक शाळा/ क.महा.यांचेमार्फत विहीत नमुन्यात व कालावधीत ऑनलाईन अर्ज करता येईल. **(जितक्या विषयासाठी उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज करावयाचा आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन अर्ज करतानां नमूद करणे आवश्यक आहे.)** |
| **पुनर्मूल्याकन** | **उत्तरपत्रिका छायाप्रत मिळालेच्या तारखेपासून मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत** | प्रती विषय रु.३००/- | | ज्या विषयाचे पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे.**(फक्त उत्तरपत्रिका छायाप्रत घेतलेल्या)** अशा सर्व विषयांसाठी एकाच वेळी ऑनलाईन पध्दतीने मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावरुन स्वत: किंवा संबंधीत शाळा तथा कनिष्ठ महा.मार्फत विहीत कालावधीत व नमुन्यात अर्ज करता येईल. |

अर्ज करावयाचे संकेतस्थळ- http://verification.mh-hsc.ac.in

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४

परिपत्रक क्रं.कोविमं/१२ वी/गोप/गु.प./जुलै ऑगस्ट-२२/1681
दिनांक : ०२/०९/२०२२

## परिपत्रक

कोल्हापूर विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी )पुरवणी **जुलै-ऑगस्ट २०२२ परीक्षेचा ऑनलाईन निकाल शुक्रवार दिनांक ०२/०९/२०२२** रोजी जाहीर झालेला असून या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन बाबत अर्ज करावयाचा असल्यास त्याबाबत अर्ज करावयाच्या तारखाचा तपशील खालीलप्रमाणे-

**गुणपडताळणी - दि.०३/०९/२०२२ ते दि.१२/०९/२०२२**
**उत्तरपत्रिका छायाप्रत - दि.०३/०९/२०२२ ते दि.२२/०९/२०२२**
**पुनर्मूल्यांकन - पुनर्मूल्यांकन सुचनामध्ये नमूद केल्याप्रमाणे.**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१२ वी) **जुलै-ऑगस्ट २०२२** च्या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन बाबत अर्ज करावयाचा असल्यास त्यासाठी च्या अटी, शर्ती व सुचना बाबत सर्व संबंधीत विद्यार्थी / शिक्षक / पालक यांचे निदर्शनास आणून आपले स्तरावरुन अवगत करण्यात याव्यात. जेणेकरुन कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

### उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१२ वी) जुलै-ऑगस्ट २०२२ साठी निकालानंतरच्या उत्तरपत्रिका गुणपडताळणी संदर्भात अटी /शर्ती व महत्वाच्या सुचना

१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१२ वी ) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास त्या परीक्षेतील स्वत:च्या अनिवार्य विषयापैकी (श्रेणी विषयाव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची पडताळणी करण्यासाठी संबंधीत विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाचे अधिकृत संकेतस्थळ (Website) वरुन स्वत: किंवा उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालय यांचेमार्फत अर्ज करता येईल. ज्या विषयासाठी गुणपडताळणी अर्ज करणे आवश्यक आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन प्रणाली मध्ये भरणे आवश्यक आहे. एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही .

२. ऑनलाईन अर्ज मंडळाच्या संकेतस्थळावरील विहीत केलेल्या नमुन्यात प्रत्येक परीक्षेच्या वेळी ऑनलाईन निकाल जाहीर झालेल्या दिनांकापासून १० दिवसापर्यंत करणे आवश्यक राहील.

३. गुणपडताळणीसाठी प्रती विषयास रुपये- ५०/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने **(Debit Card/ Credit Card/ UPI / Net Banking)** व्दारे भरता येईल.

४. गुणपडताळणीसाठी ऑनलाईन अर्जातील सर्व माहिती भरणे अनिवार्य असेल. अपूर्ण माहिती भरलेले अर्ज, कमी शुल्क भरलेले अर्ज, शुल्क न भरलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

५. गुणपडताळणीनंतर गुणात बदल झाल्यास सदरचा बदल विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. त्यानुसार गुणपडताळणीनंतर संबंधीत विद्यार्थ्यांची मुळ संपादणूक आपोआप रद्द होईल व गुण कमी झाले तरी सुधारीत संपादणूक स्विकारणे विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

६. सवलतीचे गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या गुणपडताळणीसाठी अर्ज केला असेल व गुणपडताळणीत विद्यार्थ्यांचे अशा विषयातील गुण कमी

झाल्याने तो सवलतीच्या गुणासाठी अपात्र ठरत असेल तर अशा प्रकरणी विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण निकालात बदल करण्यात येईल व तो स्विकारणे बंधनकारक असेल.

७. उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांनी गुणपडताळणीची वाट न पहाता पुढील परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी विहीत मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधीत विभागीय मंडळाकडे माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारीत मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

८. गुणपडताळणीमधील गुण वाढीमुळे विद्यार्थी सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

९. गुणात बदल नसलेल्या विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी शुल्क परत केले जाणार नाही मात्र गुणात बदल झालेल्या प्रकरणी विद्यार्थ्यांने भरलेले शुल्क परत दिले जाईल.

१०. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना गुणपडताळणीअंती पाठविण्यात येणा-या 'नो चेंज '[No Change] या निर्णयाचा अर्थ गुणपडताळणीत कोणताही बदल न होणे व उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांना गुणपडताळणीअंती पाठविण्यात येणा-या 'नो चेंज '[No Change] या निर्णयाचा अर्थ गुणपडताळणीनंतर गुणात कोणताही बदल न होणे किंवा गुणात पाच टक्क्याहून कमी गुणांचा बदल झाल्यामूळे उत्तीर्ण होवू न शकलेल्या विषयाच्या निकालात व एकूण निकालात कोणतीही बदल न होणे असा असेल.

११. गुणपडताळणीमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधीत विद्यार्थ्यांस व संबंधीत माध्यमिक शाळेस/उच्च माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविदयालयास कळविण्यात येईल. त्यानुसार विद्यार्थ्यांने मुळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर त्यास सुधारीत गुणपत्रक देण्यात येईल.

१२. विद्यार्थ्याने ऑनलाईन प्रक्रियेव्दारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती [status] संकेतस्थळावर पाहता येईल. आपल्या अर्जावरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधीत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

## उत्तरपत्रिका छायाप्रत [Photocopy of Answer Book] मिळण्यासाठी अटी/शर्ती व सुचना

१. विद्यार्थ्यांना फक्त स्वत:च्याच अनिवार्य सहा विषयाच्या (श्रेणी विषयाव्यतिरिक्त) उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी करता येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांने स्वत: किंवा शाळा/कनिष्ठ महाविदयालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन **(Website)** संबंधीत विभागीय मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांस तोंडी/प्रात्यक्षिक/श्रेणी/अंतर्गत मूल्यमापन/प्रकल्प लेखन किंवा तत्सम उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींची मागणी करता येणार नाही. ज्या विषयांची उत्तरपत्रिका छायाप्रत आवश्यक आहे ते सर्व विषय एकाचवेळी ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही.

२. परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून २० दिवसांपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहीत नमुन्यात अर्ज करता येईल.

३. छायाप्रत मिळण्यासाठी केलेल्या अर्जातील माहिती पूर्णपणे भरलेली असावी तसेच विहीत शुल्क न भरल्यास उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देण्याबाबत कार्यवाही केली जाणार नाही.

४. उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रती विषयास रु.४००/- इतके शुल्क ऑनलाईन पध्दतीने **(Debit Card /Credit Card / UPI /Net Banking)** भरता येईल. व भरणा केलेले शुल्क ना परतावा असेल. तथापि, उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यापूर्वी करण्यात येणा-या गुणपडताळणीत विद्यार्थ्यांच्या गुणात/निकालात बदल झाल्यास उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी भरलेले शुल्क परत दिले जाणार नाही.

५. उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती देण्यापूर्वी त्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी केली जाते. गुणपडताळणी केल्यानंतर त्यावर होणारा निर्णय अंतिम असेल व तो विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील. अशा प्रकरणी विद्यार्थ्यांस मुळ गुणपत्रिका संबंधीत विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतरच सुधारीत गुणपत्रिका देण्यात येईल.

६. उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी अर्ज केला असल्यास त्याच विषयाच्या गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही व असा स्वतंत्र अर्ज गुणपडताळणी शुल्कासह केल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

७. मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रती विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे देण्यात येतील. उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती घेतल्यानंतर विद्यार्थ्यांला पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करावयाचा असल्**यास त्यांनी उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती प्राप्त करुन घेण्याची सुचना संबंधीत विभागीय मंडळाकडून मिळाल्याच्या तारखेपासून कार्यालयीन कामकाजाच्या पाच (०५) दिवसात उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती घेवून जाणे बंधनकारक आहे. याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.**

I) रजिस्टर पोस्टाने मागणी केलेल्या प्रकरणात पोस्टासाठी सात (०७) दिवसाचा कालावधी सोडून कार्यालयीन कामकाजाच्या पाच (०५) दिवसात पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल.

II) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोहोच मिळाल्यापासून पाच (०५) दिवसात अर्ज करता येईल.

III) ई-मेल व्दारे / संकेतस्थळावरुन पाठविलेल्या प्रकरणी सॉफ्ट कॉपी विभागीय मंडळाकडून पाठविल्याच्या दिनांकापासून पाच (०५) दिवसात अर्ज करंता येईल.

८. उत्तरपत्रिकांची छायाप्रत समक्ष नेण्यासाठी येणा-या विद्यार्थ्यांस परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) /फोटोसह असलेले कोणतेही ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. तसेच उत्तरपत्रिकांची छायाप्रत मिळाल्याची पोहोंच देणे बंधनकारक राहील.

९. परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांना त्याच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यात येणार नाही.

**१०. संबंधीत विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिकेची छायाप्रत अन्य कोणालाही दिल्यास अथवा प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी दिल्यास विद्यार्थी कारवाईस पात्र राहील.**

११. उत्तीर्ण होव न शकलेल्या विद्यार्थ्यांने मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती मिळण्याची वाट न पाहता पुढील परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी विहीत मुदतीत उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयामार्फत आवेदनपत्र संबंधीत विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत निर्धारीत मुदतीनंतर पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

१२. उत्तरपत्रिकेची छायाप्रत देण्यापूर्वी होणा-या गुणपडताळणीमध्ये गुण वाढीमुळे सवलतीचे गुण मिळण्यास विद्यार्थी पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

१३. विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रक्रियेव्दारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (Status) संकेतस्थळावर पहाता येईल. आपल्या अर्जावरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधीत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

## उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन (Re-Valuation) करण्यासाठी अटी/शर्ती व सुचना

१. उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी विहित कालावधीत करणारे विद्यार्थीच पुनर्मूल्याकनासाठी अर्ज करु शकतील. विद्यार्थ्यांस केवळ लेखी परीक्षेच्या पुनर्मूल्यांकनासाठी मागणी करता येईल. तोंडी/ प्रात्यक्षिक / श्रेणी / अंतर्गत मुल्यमापन/ प्रकल्प लेखन असलेले विषय किंवा तत्सम उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी करता येणार नाही.

२. पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांने ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (Website) स्वत: किंवा शाळा /कनिष्ठ महाविदयालयामार्फत विहीत नमुन्यात संबंधीत विभागीय मंडळाकडे अर्ज करणे आवश्यक असेल. ज्या विषयांचे पुनर्मूल्यांकन करावयाचे आहे (छायाप्रती घेतलेल्या) अशा सर्व विषयासाठी एकाचवेळी अर्ज करणे आवश्यक आहे. एकदा अर्ज केल्यानंतर पुन्हा अर्ज करता येणार नाही.

३. उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींच्या शुल्काशिवाय विद्यार्थ्यांस पुनर्मूल्यांकनासाठी प्रती विषयास रुपये-३००/- प्रमाणे वेगळे शुल्क ऑनलाईन पध्दतीने **(Debit Card /Credit Card / UPI / Net Banking)** भरता येईल. व भरणा केलेले शुल्क ना परतावा असेल.

४. **पुनर्मूल्यांकनासाठी जास्तीत जास्त सहा(०६) विषयासाठी अर्ज करता येईल.**

५. **पुनर्मूल्यांकनासाठी उत्तरपत्रिकांची छायाप्रत मिळाल्याच्या तारखेपासून मंडळाने विहीत केलेल्या मुदतीबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.**

I]रजिस्टर पोस्टाने मागणी केलेल्या प्रकरणात पोस्टासाठी सात (०७) दिवसाचा कालावधी सोडून कार्यालयीन कामकाजाच्या पाच (०५) दिवसात पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल.

II]उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोहोच मिळाल्यापासून पाच (०५) दिवसात अर्ज करता येईल.

III] ई-मेल व्दारे / संकेतस्थळावरुन पाठविलेल्या प्रकरणी सॉफ्ट कॉपी विभागीय मंडळाकडून पाठविल्याच्या दिनांकापासून पाच (०५) दिवसात अर्ज करता येईल.

आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील संबंधीत विषय शिक्षकांकडून नमुना उत्तरे व गुणदान योजनेप्रमाणे उत्तरपत्रिकेची छायाप्रत तपासून घेवून त्यांच्या स्वंयस्पष्ट अभिप्रायासह व मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरील विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असेल. विषय शिक्षकाकडे नमुना उत्तरे व गुणदान योजना उपलब्ध नसल्यास विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

६. पुनर्मूल्यांकन करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत त्यांच्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून तपासून घ्यावयाची असल्यामूळ सदर कालावधीमध्ये शिक्षक उपलब्ध होणेबाबत संबंधीत मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी . कोणताही इच्छूक विद्यार्थी पुनर्मूल्यांकनाच्या सुविधेपासून वंचित राहू नये म्हणून उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी आपल्या शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून करुन घेवून विषय शिक्षकांचा अभिप्राय प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत मुख्याध्यापक / प्राचार्य यांची राहील.

७. इ.१२ वी च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी त्यांनी परीक्षेचे आवेदनपत्र सादर केलेल्या संपर्क माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून करुन घेवून त्यांच्याकडून अभिप्राय घेवून अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

**८. ज्या विषयात दोन पेपर/ भाग आहेत अशा विषयाच्या बाबतीत विद्यार्थ्यांस दोन्ही पेपरच्या /भागाच्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीची तपासणी आपल्या माध्यमिक शाळेतील / उच्च माध्यमिक शाळेतील / कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांकडून करुन घेवून त्या दोन्ही पेपरच्या / भागाच्या उत्तरपत्रिकेबाबतच्या अभिप्रायासह पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणे बंधनकारक असेल. केवळ एका पेपरच्या /भागाच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी विद्यार्थ्यांस करता येणार नाही.**

**९. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर त्यासोबत अ.क्रं. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विषय शिक्षकांच्या अभिप्रायाची प्रत मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह स्कॅन करुन अपलोड करावी . मात्र उत्तरपत्रिकेची छायाप्रत स्कॅन करुन अपलोड करु नये.**

१०. उत्तरपत्रिकेचे एकदा पुनर्मूल्यांकन केल्यानंतर सदर उत्तरपत्रिकेची पुनश्च: गुणपडताळणी किंवा छायांकित प्रतीची मागणी विद्यार्थ्यांस करता येणार नाही.

**११. पुनर्मूल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिकेच्या छायाप्रतीसाठी मागणी विद्यार्थ्यांस माहितीच्या अधिकारात ही करता येणार नाही.**

१२. पुनर्मूल्यांकनात गुणात बदल झालेल्या प्रकरणी फक्त बदल झालेल्या विषयासाठी विद्यार्थ्यांने भरलेले पुनर्मूल्याकन शुल्क परत दिले जाईल.

१३. वस्तूनिष्ठ प्रश्नांच्या (उदा. रिकाम्या जागा भरा, जोडया जुळवा, योग्य पर्याय निवडा, चूक की बरोबर लिहा इ. प्रकारचे प्रश्न) बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्यामध्ये होणारी गुणांची वाढ किंवा घट जशीच्या तशी ग्राहय धरण्यात येईल.

**१४. वस्तूनिष्ठ प्रश्न सोडून इतर सर्व प्रश्नांसाठी एकत्रितरित्या त्या विषयामध्ये पूर्वी मिळालेल्या गुणांच्या (मुळ गुणांच्या ). किमान ५ % कमी किंवा जास्त गुण पुनर्मूल्यांकनात झाल्यास सुधारीत गुण ग्राहय धरण्यात येतील. पाच टक्क्यापेक्षा कमी गुण बदल प्रकरणी गुणात कोणताही बदल न करता**

**' नो चेंज ' [ No Change ] असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही. मात्र संबंधीत विषयाच्या लेखी परीक्षेत ९० % किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झालेले आहेत अशा विषयांच्या पुनर्मूल्यांकनांत गुण वाढ मंजूर करण्यासाठी ५% गुण वाढतील / कमी होतील ही अट शिथील करुन जितके गुण वाढतील / घटतील ते विद्यार्थ्यास देण्यात येतील.**

१५. उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुनर्मूल्यांकनानंतर त्याच्या मुळ निकालात बदल होत नसल्यास तसेच विषयात उत्तीर्ण होत नसल्यास पाच टक्के किंवा अधिक गुण बदल प्रकरणी त्याच्या मुळ निकाल व संपादणूक कायम ठेवून त्यास ' नो चेंज ' [ No Change ] असे कळविण्यात येईल व अशा प्रकरणी कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

१६. उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन केल्यानंतर होणारा निर्णय अंतिम राहील व तो विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल. त्यानुसार पुनर्मूल्यांकनानंतर संबंधीत विद्यार्थ्यांच्या विषयाची मुळ संपादणूक आपोआप रद्द होवून सुधारीत संपादणूक स्विकारणे विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

१७.पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधीत विद्यार्थ्यांस व संबंधीत माध्यमिक शाळेस / उच्च माध्यमिक शाळेस /कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार विद्यार्थ्यांचे मुळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर त्यास सुधारीत गुणपत्रक देण्यात येईल.

१८.एखादया विषयात सवलतीचे गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झालेला असेल व अशा विद्यार्थ्यांने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला व पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांचे गुण कमी
झाल्यास व त्यामुळे विद्यार्थी सवलतीच्या गुणासाठी अपात्र ठरल्यास अशा प्रकरणी संबंधीत विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण या निकालात बदल करण्यात येईल. (संदर्भ- पुणे पत्र क्रं. रा.मं.परीक्षा-२/५१४९/पुणे-०४/ दि.०१/०९/२०२२ अन्वये)

१९. पुनर्मूल्यांकनातील गुणवाढीमुळे सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

२०.पुनर्मूल्यांकनाचा ऑनलाईन अर्ज, त्यासोबत सादर करावयाचे विषय शिक्षकांचे अभिप्राय मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह तसेच आवश्यक शुल्क मंडळाने निर्धारीत केलेल्या मुदतीमध्ये संबंधीत विभागीय मंडळाकडे ऑनलाईन जमा करणे आवश्यक असेल.

२१. उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाची वाट न पहाता पुढील परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी विहित मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधीत विभागीय मंडळाकडे माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळेमार्फत /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारीत मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

२२.एखादया उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल व त्याचवेळी त्याने पुढील परीक्षेसाठी आवेदन पत्र भरले असेल आणि पुनर्मूल्यांकनानंतर जर त्याचा परीक्षेचा निकाल बदलला तर त्याने भरणा केलेले संपूर्ण शुल्क (परीक्षा शुल्क व इतर ) त्याला परतावा म्हणून देण्यात येईल.

२३.विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रक्रियेव्दारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (Status) संकेतस्थळावर पहाता येईल. आपल्या अर्जावरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधीत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेकरिता http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरुन आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

तसेच विद्यार्थ्यांनी तांत्रिक बाबी संदर्भात अडचणी / शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडी वर अथवा ०२०-२५७०५२०७, २५७०५२०८ या दुरध्वनी क्रंमाकवर संपर्क साधावा.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

१७.पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणात बदल झाल्यास तसे संबंधीत विद्यार्थ्यांस व संबंधीत माध्यमिक शाळेस / उच्च माध्यमिक शाळेस /कनिष्ठ महाविद्यालयास कळविण्यात येईल. त्यानुसार विद्यार्थ्यांचे मुळ गुणपत्रक विभागीय मंडळाकडे जमा केल्यानंतर त्यास सुधारीत गुणपत्रक देण्यात येईल.

१८.एखादया विषयात सवलतीचे गुण मिळवून विद्यार्थी उत्तीर्ण झालेला असेल व अशा विद्यार्थ्यांने सवलतीचे गुण मिळालेल्या विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज केला व पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यार्थ्यांचे गुण कमी

झाल्यास व त्यामुळे विद्यार्थी सवलतीच्या गुणासाठी अपात्र ठरल्यास अशा प्रकरणी संबंधीत विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण या निकालात बदल करण्यात येईल. (संदर्भ- पुणे पत्र क्रं. रा.मं.परीक्षा-२/५१४९/पुणे-०४/ दि.०१/०९/२०२२ अन्वये)

१९. पुनर्मूल्यांकनातील गुणवाढीमुळे सवलतीचे गुण मिळण्यास पात्र ठरत असल्यास त्यास ते गुण देय असतील.

२०.पुनर्मूल्यांकनाचा ऑनलाईन अर्ज, त्यासोबत सादर करावयाचे विषय शिक्षकांचे अभिप्राय मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह तसेच आवश्यक शुल्क मंडळाने निर्धारीत केलेल्या मुदतीमध्ये संबंधीत विभागीय मंडळाकडे ऑनलाईन जमा करणे आवश्यक असेल.

२१. उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनाच्या निकालाची वाट न पहाता पुढील परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी विहित मुदतीत परीक्षेचे आवेदनपत्र संबंधीत विभागीय मंडळाकडे माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळेमार्फत /कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सादर करणे आवश्यक आहे. निर्धारीत मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील परीक्षेचे आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

२२.एखादया उत्तीर्ण होवू न शकलेल्या विद्यार्थ्यांने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल व त्याचवेळी त्याने पुढील परीक्षेसाठी आवेदन पत्र भरले असेल आणि पुनर्मूल्यांकनानंतर जर त्याचा परीक्षेचा निकाल बदलला तर त्याने भरणा केलेले संपूर्ण शुल्क (परीक्षा शुल्क व इतर ) त्याला परतावा म्हणून देण्यांत येईल.

२३.विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रक्रियेव्दारे केलेल्या अर्जाची सद्यस्थिती (Status) संकेतस्थळावर पहाता येईल. आपल्या अर्जावरील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच आवश्यकता भासल्यास संबंधीत विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेकरिता http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरुन आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

तसेच विद्यार्थ्यांनी तांत्रिक बाबी संदर्भात अडचणी / शंका असल्यास (support@msbshse.ac.in) या ई-मेल आयडी वर अथवा ०२०-२५७०५२०७, २५७०५२०८ या दुरध्वनी क्रंमाकंवर संपर्क साधावा.

(डी. एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची छायाप्रत व पुनर्मूल्यांकन यासाठी ऑनलाईन प्रक्रिया

# विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक सुचना

१. उत्तरपत्रिका गुणपडताळणी/छायाप्रत/पुनर्मूल्यांकन यासाठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षाकरिता http://verification.mh-hsc.ac.in या संकेतस्थळावरुन आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील.

२. विद्यार्थ्यांने उत्तरपत्रिका गुणपडताळणी/ छायाप्रत/ पुनर्मूल्यांकन यासाठी करावयाच्या ऑनलाईन अर्जामध्ये भरावयाची माहिती बिनचूक भरावी. अर्ज प्रणालीमध्ये **SUBMIT** केल्यानंतर त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३. ऑनलाईप प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांस उत्तरपत्रिका गुणपडताळणी/ छायाप्रत/ पुनर्मूल्यांकन या प्रत्येक बाबीसाठी फक्त एकदाच अर्ज करता येईल. त्यामूळे अर्ज भरण्यापूर्वी विषयांची संख्या निश्‍चित करुनच अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. कोणत्याही परिस्थितीत दुबार अर्ज स्विकारले जाणार नाहीत..

४. उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याकरिता अर्ज करताना विषय शिक्षकांचा अभिप्राय **pdf file** या स्वरुपात (**file size 15 MB** पर्यंत) अपलोड करणे अनिवार्य आहे. तसेच सदर अभिप्राय सुस्पष्ट असणे आवश्यक आहे.

५. विद्यार्थ्यांनी तांत्रिक बाबीसंदर्भात अडचणी / शंका असल्यास [ support@msbshse.ac.in ] या ई-मेल आयडी वर अथबा ०२०-२५७०५२०७, २५७०५२०८ या दुरध्वनी क्रंमाकावर संपर्क साधावा.

६. ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भातला व्हिडीओ पहाण्यासाठी विद्यार्थ्यांनी **HELP** या पर्यायाची निवड करावी. उत्तरपत्रिका गुणपडताळणी, छायाप्रत, पुनर्मूल्यांकन या तीनही प्रकारासाठी स्वतंत्र व्हिडीओ देण्यात आलेले आहेत.

(डी.एस. पोवार)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

ऑनलाईन अर्ज करावयाचे संकेतस्थळ- http://verification.mh-hsc.ac.in

# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा (इ.१२वी)
जुलै - ऑगस्ट २०२२ परीक्षेसाठी
गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रत व पुनर्मूल्यांकन बाबत
ऑनलाईन अर्ज करावयाचे संकेतस्थळ [Website] -

**http://verification.mh-hsc.ac.in**

विद्यार्थ्यांनी तांत्रिक बाबी संदर्भात अडचणी/शंका असल्यास

**(support@msbshse.ac.in)**

या ई-मेल आयडीवर अथवा ०२० -२५७०५२०७, २५७०५२०८ या दुरध्वनी क्रंमाकवर संपर्क साधावा.